दाखल तारीख : २८/०८/२०२५
नोंदणी तारीख : २८/०८/२०२५
निकाल तारीख : ०७/०५/२०२६
कालावधी : व. — म. — दि.
००  ०५  ०९

## पुसद येथील ४ थे न्यायदंडाधिकारी वर्ग–१ यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी अमिता यु. यादव)**

**समरी केस क्र.२१००/२०२५**
(सदरचा खटला समन्स संपरिक्षे प्रमाणे चालविण्यात आला.)
**निशाणी क्र. : १४**

महाराष्ट्र सरकारतर्फे
शहर पोलीस ठाणे पुसद,
ता.पुसद, जि. यवतमाळ ..... **अभियोगपक्ष**

**विरुद्ध**

**१. किशोर प्रल्हाद जाधव,**
वय — ३२, धंदा — मजुरी,
रा. शेंबाळपिंपरी, पुसद, ता.पुसद, जि.यवतमाळ

**२. विशाल दिपक पारधे,**
वय — २६, धंदा — मजुरी,
रा. तुकाराम बापुवार्ड, पुसद, ता.पुसद, जि.यवतमाळ

**३. समीर उर्फ ईमरान खान सलीम खान,**
वय — ३०, धंदा — मजुरी,
रा. आझाडवार्ड, मोमीनपुरा धनकेश्वर मंदीर पुसद,
ता.पुसद, जि.यवतमाळ ..... **आरोपी**

.................................................................................................

**गुन्हा — मुंबई जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) अन्वये**

.................................................................................................

**या न्यायालयास समरी खटला चालविण्याचे अधिकार नसल्याने प्रस्तुत प्रकरण समन्स खटला पध्दतीने चालविण्यात आले.**

.................................................................................................

अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील :— श्री.एस. एस. जवंजाळ
आरोपी क्रं. ०१ तर्फे वकील :— श्री.ए.डी.रुडे
आरोपी क्रं. ०२ तर्फे वकील :— श्री.आर.पी.कांबळे
आरोपी क्रं. ०३ तर्फे वकील :— श्री.इमरान चव्हाण

.................................................................................................

## न्यायनिर्णय

(दिनांक ०७/०५/२०२६ रोजी घोषित)

**१.** आरोपी विरुद्ध मुंबई जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा केल्याचा दोषारोप आहे.

**२.** अभियोगपक्षाची थोडक्यात हकीगत खालीलप्रमाणे :—

दिनांक ०६/०८/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजेच्या सुमारास पंच साक्षीदार यांच्याकडून माहिती मिळाली की, बिडवाई यांचे गोडाउन, शिवाजीवार्ड, पुसद येथे आरोपी मोकळया जागेत सार्वजनिक ठिकाणी काही इसम अवैधरित्या वरळी मटका नावाचा जुगाराचा खेळ खेळत व खेळवीत आहे. त्यामुळे साक्षीदार, पोलिस स्टाफ व पंच असे खाजगी वाहनाने घटनास्थळी गेले. बातमीची खात्री केली व आरोपींवर छापा टाकला व त्यांच्याकडुन रोख रक्कम व जुगाराचे साहित्यासह पकडले. त्यानुसार आरोपींविरुद्ध फिर्यादीने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

**३.** फिर्यादीच्या फिर्यादीवरुन आरोपी विरुद्ध गु.र.क्र.४६९/२०२५ नुसार मुंबई जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हाचा तपास पो.कॉ.सौ.मनिषा वाघमारे ब.नं.२१०२, यांच्याकडे देण्यात आला. तपासी अधिकारी यांनी गुन्हाचा तपास करुन न्यायालयात आरोपी विरुद्ध दोषारोपपत्र सादर केले.

**४.** प्रस्तूत प्रकरण जरी समरी केस म्हणून नोंदविण्यात आलेले असले तरी ते समन्स संपरिक्षेप्रमाणे चालविण्यात आले. आरोपी न्यायालयासमोर हजर झाल्यानंतर त्यांच्या विरुद्ध ***निशाणी क्रमांक—१४*** लगत मुंबई जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) प्रतिकथन नोंदविण्यात आले. आरोपींना त्यांच्यावरील आरोप वाचून व

समजावून सांगण्यात आले. आरोपीने त्यांच्यावरील सर्व आरोप नाकारले व खटला चालविण्याचे सांगितले. आरोपीविरुद्ध सबळ पुरावा न आल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ अन्वयेचा जबाब वगळण्यात आला.

**५.** अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील तर आरोपीतर्फे वकील श्रीमती सुचिता नरवाडे युक्तीवाद केला. अभियोगपक्षाची हकीगत न्यायालयासमोर आलेला साक्षीपुरावा आणि उभयतांचा युक्तिवाद विचारात घेता पुढील वादप्रश्न उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| **१.** | दिनांक ०६/०८/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता बिडवई यांचे गोडाउन, शिवाजीवार्ड, पुसद आरोपी हे मोकळया जागेत सार्वजनिक ठिकाणी स्वत:च्या फायद्यासाठी वरळी मटका नावाचा जुगाराचा खेळ खेळतांना व खेळवितांना तसेच रोख रक्कम रुपये ८७,०००/— व सट्टा जुगाराचे साहीत्यासह मिळून आलेत व त्यायोगे आरोपी यांनी मुंबई जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय? | **नकारार्थी** |
| **२** | काय आदेश ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.** |

**<u>वादप्रश्न क्र. १ करीता</u> —**

**६.** आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे एक साक्षीदार तपासण्यात आला. साक्षीदार क्र.१ प्रतिम सदाशिव आळणे यांचा साक्षीपुरावा ***<u>नि.क्र.१४</u>*** वर नोंदविण्यात आला. साक्षीदार क्रमांक—१ हा जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहे.

७. अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपी हे स्वत:च्या फायदयासाठी सट्टा जुगाराचा खेळ खेळत असतांना मिळून आले व आरोपी यांच्या ताब्यातुन एकूण रक्कम रुपये ८७,०००/— व सट्टा जुगाराचे साहित्यासह मिळून आले. सदरहू बाब सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक—१ हा घटनेचा पंच साक्षीदार आहे. घटनास्थळावरून पंचांसमक्ष रोख रक्कम व सट्टा जुगाराचे साहित्य जप्त केले आहे, हे सिध्द करणे गरजेचे आहे. त्यामुळे तपासण्यात आलेल्या पंच साक्षीदारांची साक्ष बारकाईने तपासावी लागेल. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्रमांक—१ यांनी पंचनाम्याबाबतची कार्यवाही कश्याबाबत केली हे त्याला माहीत नसल्याचे त्यांनी कथन केल्याने साक्षीदाराला भारतीय साक्ष अधिनियम कलम १५७ नुसार तपासण्यात आले परंतु, अभियोग पक्षास मदत होईल असे काहीही त्यांच्या पुराव्यात आलेले नाही. त्यामुळे सदर पंचनामा संशयापलिकडे सिद्ध झाल्याचे म्हणता येत नाही. त्यामुळे, त्यांचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

८. अभियोग पक्षाने या कथनासह आरोपीविरुद्ध खटला आणला आहे की, आरोपी हे स्वत:च्या फायद्याकरीता सदरील खेळ खेळत होते. सदर कायदाचा विचार केला असता जुगार म्हणजे एकपक्षी आवारात किंवा मान्यता दिलेल्या जागेत उपस्थित असलेली प्रत्यक्ष व्यक्ती आणि दुस—या पक्षी असे लायसन्स धारण करणारी किंवा अशी लायसने धारण करणा—या व्यक्तींनी किंवा उपरोक्त लायसन्सच्या अटींना अनुसरुन परवानगी दिलेल्या इतर व्यक्ती यांच्या दरम्यान किंवा प्रत्यक्षपणे कितीही व्यक्तींच्या दरम्यान अशा लायसन्सद्वारे परवानगी देण्यात येईल अशा रितीने व अशा साधनाने, पैज लावण्यात येईल किंवा सट्टा खेळण्यात येईल ती पैज किंवा तो सट्टा याखेरीज, पैज लावणे किंवा सट्टा खेळणे यांचा समावेश होतो. प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपी कोणता सट्टा किती पैसे लावून किती पैसे कमविण्याच्या उद्देशाने कोणती पैज लावून खेळत होता हे सिध्द करण्यास अभियोग पक्षास अपयश आले आहे.

९. आरोपींना दोषी ठरविण्यासाठी त्यांचे विरुध्द असलेला दोषारोप नि :संशयरित्या शाबीत होणे आवश्यक असते. तसेच मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा

कलम १२ — अ अन्वये गुन्हा सिध्द होण्यासाठी जप्ती पंचनामा सिध्द होणे आवश्यक असते. जप्ती पंचनामा हा निसंशयपणे सिध्द झालेला नाही. त्यामुळे आरोपींनी गुन्हा केल्याचे निसंशयपणे म्हणता येणार नाही. म्हणून पुराव्या अभावी आरोपींविरुध्द असलेला दोषारोप नि:संशयरित्या शाबीत होत नाही. त्यामुळे वादप्रश्न क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत असुन वादप्रश्न क्रमांक २ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी क्रं. १ **किशोर प्रल्हाद जाधव**, आरोपी क्रं. २ **विशाल दिपक पारधे** व आरोपी क्रं. ०३ **समीर उर्फ ईमरान खान सलीम खान**, यांना मुंबई जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

**३.** अपील कालावधीनंतर जप्त मुद्देमाल एकुण रोख रक्कम रु. २१००/— (अक्षरी दोन हजार शंभर रुपये मात्र) सरकार जमा करण्यात यावी व सट्टा जुगाराचे साहित्य मुल्यहीन असल्याने नाश करण्यात यावे.

**४.** सदरील प्रकरणातील मोबाईल व स्प्लेंडर वाहन याचा सुपुर्तनामा अपील कालावधीनंतर कायम करण्यात यावा.

**५.** भारतीय नागरीक सुरक्षा संहीता कलम ४८१ अन्वये आरोपीने जामीनाची पुर्तता करावी.

Digitally signed by AMITA U YADAV
Date: 2026.05.07 14:59:25 +0530

दिनांक — ०७/०५/२०२६.

**(अमिता.यु.यादव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(४ थे न्यायालय) पुसद